


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : २९५ वा    शुक्रवार    दि. २४ जानेवारी २०२५    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# महाभ्रष्टाचारी टेकाळेंच्या चौकशीसाठी एसडीओंची एव्हढी टाळाटाळ कशासाठी ?

## निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचे आता सहाव्यांदा स्मरणपत्र...

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या घोटाळ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात महसूल विभागातील अनेक वरिष्ठ अधिकारी गेल्या अनेक महिन्यांपासून टाळाटाळ करीत असल्याचे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यापूर्वीच आपल्या वाचकांसमोर ठेवले आहे. परंतु काही अधिकारी हे ढिसाळपणाचा कळस करीत आहेत. नुकतेच निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी बुलढाणा उपविभागीय अधिकाऱ्यांना तब्बल सहावे स्मरणपत्र पाठवून यासंदर्भात चौकशीची आठवण करून दिलेली आहे. यावरून हे स्पष्ट आहे की, यापूर्वी पाच वेळा स्मरणपत्रे देऊनही उपविभागीय अधिकाऱ्यांनी यासंदर्भात कोणतीही कारवाई केलेली नाही. एसडीओंचा एव्हढा ढिसाळपणा कशासाठी हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे. महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या चौकशीसाठी व त्यांच्यावर फौजदारी कारवाईसाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने प्रयत्न करीत आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचे मुख्य संपादक जितेंद्र कायस्थ हे सातत्याने महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करीत आहेत. परंतु अधिकारी हे आपला निर्लज्जपणा वारंवार सिद्ध करण्याचे काम करीत आहेत. कारण कोणताही अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यास तयार नाही, असे दिसून येत आहे. यासंदर्भात जेंव्हा पुन्हा एकदा जिल्हाधिकारी कार्यालयाशी दैनिक जनसंचलनच्या वतीने पत्रव्यवहार करण्यात आला, तेंव्हा निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी तब्बल सहावे स्मरणपत्र उपविभागीय अधिकाऱ्यांना पाठवले आहे. या पत्रात निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, यापूर्वी टेकाळे यांच्या चौकशीसाठी तहसीलदार व नायब तहसीलदारांची चौकशी समिती नेमण्यात आली होती. परंतु दीड वर्षाचा कालावधी उलटून देखील या चौकशी समितीचा कोणताच अहवाल हा महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पोहचलेला नाही. त्यामुळे गेल्या दीड वर्षांपासून या भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशी किती कासवगतीने सुरू आहे दिसून येत आहे. बुलढाण्याचे तहसीलदार हे थंड गतीने काम करतात, हे देखील दिसून आलेले आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यापूर्वीच आरोप केला होता की, बुलढाण्याचे संबंधित तसेच महसूल विभागातील अनेक अधिकाऱ्यांचे टेकाळे यांच्याशी अर्थपूर्ण संबंध आहेत. टेकाळेंच्या भ्रष्टाचारात महसूल विभागातील अनेक अधिकारी सामील आहेत. त्यामुळेच टेकाळे यांची ना धड चौकशी होते ना त्यांच्यावर कोणतीही कारवाई होते. आता तर निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी तब्बल सहावे स्मरणपत्र देऊन उपविभागीय अधिकाऱ्यांना एकप्रकारे तंबीच दिली आहे. त्यामुळे आता तरी उपविभागीय अधिकारी यासंदर्भात योग्य ती कारवाई करतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. वास्तविकतः दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराचे कागदोपत्री ठोस पुरावे हे महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केलेले आहेत. मात्र, महसूल विभागाचे अधिकारी केवळ कागदी घोडे नाचवण्याचे प्रकार करीत आहेत. एकीकडे टेकाळे यांनी बेशरमपणे आणि नालायकपणे भ्रष्टाचार करायचा आणि त्या भ्रष्टाचाराला महसूलच्या तेव्हढेच काही बेशरम अधिकाऱ्यांनी पाठबळ द्यायचे, असा नाटकी खेळ सध्या महसूल विभागात सुरू आहे. टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराची कीड ही महसूल विभागाच्या नसनसात भिनली आहे. त्यामुळे टेकाळे यांच्यावर कारवाईस करण्यास कोणताही अधिकारी धजावत नाही. या भ्रष्टाचारामुळे अधिकाऱ्यांमध्ये एव्हढ्या प्रचंड प्रमाणात लाचारी आणली आहे की, दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने टीकाटिप्पणी करीत असतानासुद्धा ढिसाळ महसूल प्रशासन जागचे हलायला देखील तयार नाही. कितीही टीका झाली तर महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी अत्यंत ढिम्म होऊन कामकाज करीत आहेत. परिस्थिती कितीही बिकट असली आणि महसूल प्रशासन कितीही ढिसाळ असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जोपर्यंत टेकाळे यांच्यासारख्या महाभ्रष्टाचाऱ्यांवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत आपली लेखणी जनतेच्या हितासाठी चालवतच राहणार आहे.

**बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी यांच्या तलाठी ते मंडळ अधिकारी च्या काळात आज पर्यंत जी काही नियमात न बसणारे नियमबाह्य कामे करून ( ब्रोकर ) धनदांडग्याचे करोडो रुपयांची जमिनी शासनाचा महसूल बुडवून कागदोपत्री केल्या त्या सर्व प्रकरणाची पुराव्याणीशी पोलखोल पुढील प्रत्येक भागात प्रकाशित करणार**




**अजून बरेच काही पुढील भागात...**

# ती कायदेशीर थांबली होती परंतु डंपर यमदूत बनून आला!

## धोत्रा नाईकच्या मुक्ताईचा पुण्यात अपघाती मृत्यू!

**जनसंचलन/बुलढाणा**

शांत व सालस स्वभावाची मुक्ताई पुणे येथील एका ट्राफिक सिग्नल वर दुचाकी घेऊन थांबलेली होती. परंतु यमदूत बनवून आलेल्या भरधाव डंपरने जोरदार धडक दिल्याने तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मुक्ता संतोषराव काळे असे या मृतक मुलीचे नाव आहे. ती मोताळा तालुक्यातील धोत्रानाईक येथील संतोषराव शिवाजी काळे यांची कन्या व अरविंद माधवराव धवणे यांची नात आहे.मुक्ताई ही आई-वडिलांसह शिक्षणासाठी पुणे येथे वास्तव्यास होती.दरम्यान क्लासला जाताना बाणेर येथे ती ग्रीन सिग्नल मिळाल्याने थांबली होती.दरम्यान अचानक मागून आलेल्या एका भरधाव वाहनाच्या धडकेत मुक्ताचा नियतीने डाव साधला.मुक्ताच्या दुचाकी वर आणखी एक मैत्रीण होती ती देखील जखमी झाली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# थप्पड नाही टक्कल पडते राजा!

# जागतिक आरोग्य संघटना करते तरी काय?

जनसंचलन/बुलढाणा

पुष्पा सिनेमातील थप्पड पडते राजा हे गाणं गाजू लागले..तसे बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील १२ गावांमधील टक्कल पडते राजा हे गाणे बेसूर आवाजात गाजत आहे.परंतु गलेलट्ट पगार घेणाऱ्या शासकीय म्हणा किंवा खाजगी संस्था करतात काय?हा प्रश्न निर्माण झाला आहे. मागील अनेक दिवसापासून शेगाव तालुक्यातील अनेक गावात केसगळती आणि टक्कल पडण्याच्या विचित्र आजाराने हजारो ग्रामस्थ हवालदील झाले आहे. मात्र राज्य आणि केंद्र सरकार सर्वसामान्य ग्रामस्थांना दिलासा देण्यात सपशेल अपयशी ठरले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर यांनी शेगाव येथे बोलताना हा गंभीर आरोप करतानाच राज्य आणि केंद्रातील आरोग्य संस्था या गूढ आजाराचे निदान करण्यात अपयशी ठरल्याने यासाठी जागतिक आरोग्य संस्थेची मदत घ्यावी, त्यांच्या चमुला यासाठी पाचारण करण्याची मागणी केली आहे. शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे बुलढाणा जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर यांनी हे विधान करून सत्ताधाऱ्यांना आव्हान दिले. शेगाव तालुक्यातील केस गळती बाधित बोन्डगाव, कालवड, कठोरा, मच्छिन्द्रखेड, भोनगाव, आदि गावांना भेटी दिल्या. या भेटीत त्यांच्या समवेत ठाकरे गटचे पदाधिकारी उपस्थित होते . यानंतर खेडेकर यांनी शेगाव येथील प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधी समवेत संवाद साधला. यावेळी त्यांनी आपला संताप व्यक्त करताना राज्य सरकार, केंद्र सरकार, आरोग्य यंत्रणा धारेवर धरले.राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य यंत्रना, राज्याचा आरोगय विभाग यांना शेगाव तालुक्यातील केस गळती आणि टक्कल पडण्याचे कारण शोधता येत नसेल तर डब्ल्यू एच ओ च्या टीमला पाचारण करा, अशी रोखठोक मागणीच खेडेकर यांनी केली.केस गळती प्रकरणावरून उबाठा शिवसेनेचा संताप व्यकत करताना खेडेकर म्हणाले कि, मागील अनेक दिवसापासून बुलढाणा जिल्ह्यात केस गळतीने दहशत निर्माण केली आहे. केस गळती आजाराची रुग्णसंख्या दोनशेच्या पर गेली आहे. शेगाव पाठोपाठ नांदुरा तालुक्यातील वाडी गावात देखील सात रुग्ण आढळून आले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव तालुक्यात गेल्या वीस दिवसापासून केस गळतीचे दहशतीने अनेकांना चिंताग्रस्त करून सोडले आहे. स्थानिक आरोग्य यंत्रणपासून राष्ट्रीय पातळीवरच्या आरोग्य संस्था केस गळतीचे कारण शोधण्यासाठी बाधित गावात येऊन गेल्या आहेत. अनेक तज्ज तळ ठोकून मुक्कामी राहिले. आयसीएमआर दिल्ली, चेन्नई सारख्या संस्थेचे तज्ज्ञ येऊन गेले. मात्र अजूनही केस गळतीचे नेमके कारण शोधण्यात या आरोग्य संस्थांना यश आलेले नाही. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राष्ट्रीय पातळीवरच्या संस्थांना देखील केस गळतीचे नेमके कारण सापडत नसेल तर आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ)ला या प्रकरणात पाचारण करण्याची मागणी यावेळी उबाठा शिवसेनेचे संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर यांनी केली. बाधित गावांतील सध्याचे चित्र काय?

विविध आरोग्य यंत्रणा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पथक, राष्ट्रीय स्तरावरील



नामांकित आरोग्य संशोधन संस्था यांच्या मुक्कामी भेटीचा धडाका , नमुने संकलन अन सर्वेक्षणाचा महापूर असे आठवड्यापासूनचे चित्र आहे. या अनामिक आजाराचे आठवड्यानंतरही अचूक निदान आणि उपचार न सापडल्याने बारा गावातील हजारो गावकरी हवालदिल आणि भयभीत झाले आहेत. अनामिक दहशतीत ते राहत आहे नांदुरा तालुक्यातील वाडी या १९४२ लोकसंख्या असलेल्या गावाचा समावेश आहे . येथील सात रुग्ण तीन परिवारातील आणि ३ ते ४५ या वयोगटातील आहेत. शेगाव तालुक्यातील बोन्डगाव, कालवड, कठोरा, भोनगाव, मच्छीन्द्रखेड, हिंगणा, घुई, तरोडा खुर्द, पहुरजीरा, माटरगाव, आणि निंबी ही गावे बाधित आहेत . बारा गावांतील २४ हजार २८४ ग्रामस्थ भीतीने गारठले आहे. यंत्रणा अपयशी ठरल्या का?

दुर्देवाने याचे उत्तर हो असेच आहे, असे म्हणता येईल.पट्टीचे आरोग्य विषयक शास्त्रज्ञ आणि तज्ज वैद्यकीय तज्ञ या आजारापुढे हतबल ठरले . केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या गृह जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा किती तोकडी आणि जागतिक महासत्ता बनण्याचे दिवास्वप्न पाहणाऱ्या भारत देशातील सर्वोच्च आरोग्य संशोधन संस्थाच्या मर्यादा उघड्या पडल्या. अब्जावधींचे बजेट असणाऱ्या या संस्थाचे हे घोर अपयश तूर्तास तरी अधोरेखित झाले आहे. शेगाव तालुक्यात वायसीएमआर दिल्ली, चेन्नई, भोपाळ येथील शास्त्रज्ञ, वैद्यकीय तज्ज्ञ येऊन गेले. अलोपॅथी, होमीओपॅथी, युनानी आणि आयुष् (आयुर्वेद) या चार प्रमुख वैद्यक शाखांचे तज्ञ येऊन गेले. नागपूर येथील पथकाने भेट दिली. अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ची पथके आलीत, जिल्हा आरोग्य यंत्रणा २४ बाय सात सेवेत दक्ष आहेत. १४ जानेवारी अखेर शेगाव तालुक्यात १७१ ते नांदुरा तालुक्यात ७ मिळून १७८ रुग्ण निष्पन्न झाले.या गावातील जल, रक्त, नख केस, यांचे नमुने वेगवेगळ्या प्रयोगशाळा मध्ये पाठविण्यात आले आहे. स्किन बायोप्सी देखील पाठविण्यात आले आहे. तसेच पाण्यातील लीड, आर्सेलीन, कॅडीमिनियंम सारख्या हेवी मेटल्स ची नाशिकच्या खाजगी प्रयोगशाळा मध्ये तपासणी करण्यात येणार आहे.

---

# श्रीमती नीताताई बोबडे आधुनिक सावित्री पुरस्कार २०२५ ने सन्मानित

जनसंचलन/ खामगाव

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणारा करिअर कट्टा हा उपक्रम, या उपक्रमांतर्गत दिनांक १२ व १३ जानेवारी २०२५ रोजी श्रीमती शारदाबाई पवार महिला महाविद्यालय शारदानगर, बारामती येथे पार पडलेल्या दोन दिवसीय राज्यस्तरीय करिअर संसद अधिवेशनामध्ये महाराष्ट्रातील कर्तुत्ववान महिलांना आधुनिक सावित्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये श्रीमती नीताताई बोबडे, अध्यक्ष निसर्ग संस्था खामगाव यांना त्यांच्या निसर्गप्रेमी, पर्यावरण पूरक कार्याकरिता आधुनिक सावित्री पुरस्कार २०२५ ने गौरविण्यात आले.. श्रीमती नीताताई बोबडे ह्या परिसरातील महिलांना बचत गटाच्या माध्यमातून, इतर समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना टाकाऊ पासून टिकाऊ तसेच निसर्गातील सहज उपलब्ध असलेल्या वस्तूंपासून विविध शोभिवंत वस्तू तयार करणे तसेच वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, विविध उत्सवानंतर निर्माल्य गोळा करून त्यापासून उत्कृष्ट खत बनविण्याचे प्रशिक्षण देतात व त्या माध्यमातून हजारो स्त्रियांना एक अर्थार्जनाचा मार्ग उपलब्ध करून देण्याकरिता अविरत कार्यरत असतात. श्रीमती नीताताई उत्कृष्ट कवयित्री असून त्यांनी अनेक प्रसारमाध्यमांमधून आपल्या कविता लेख प्रसिद्ध केले आहेत. तसेच त्यांचे कविता संग्रह सुद्धा प्रसिद्ध झाले आहेत. ह्या कार्याकरिता अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. याची दखल आकाशवाणी, अनेक टीव्ही चॅनेल्स व प्रसारमाध्यमांनी घेतलेली आहे. ह्याच अविरत चालणाऱ्या नीताताईंच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान साहित्य केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणारा करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय करियर संसद अधिवेशनामध्ये ताईंना आधुनिक सावित्री पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे अध्यक्ष सन्माननीय राजेंद्र पवार तसेच प्रमुख अतिथी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष सन्माननीय यशवंत शितोळे उपस्थित होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे नीताताई सदर कार्यक्रमाला उपस्थित राहू न शकल्यामुळे सदर पुरस्कार त्यांचे वतीने सौ. आशा तळवणकर यांनी स्वीकारला. सदर पुरस्कार गो. से. महाविद्यालयामध्ये संत




गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी विकास कक्षाचे संचालक डॉ. राजीव बोरकर यांचे हस्ते, आनंदी गुरुकुल च्या अध्यक्षा प्रा. दिपाली सोसे यांचे प्रमुख उपस्थितीत श्रीमती नीताताई बोबडे यांना सन्मानित करून प्राचार्य डॉ धनंजय तळवणकर यांचे द्वारे सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमाला संपूर्ण महाराष्ट्र राज्यांमधून विविध महाविद्यालयाचे प्राचार्य समन्वयक तसेच सुमारे १००० विद्यार्थी उपस्थित होते. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रतिष्ठित फुकट्यांच्या शासकीय लाभावर उड्या!

## त्रस्त गरजू लाभार्थी म्हणतोय मेरा नंबर कब आएगा?

### लांबच लांब रांगा..रात्री १ वाजता नंबर लावल्यावर सकाळी ५ वाजता लागतोय नंबर!

**जनसंचलन/बुलढाणा**

शासकीय लाभ म्हटलं की, प्रतिष्ठित फुकट्यांच्या आधी उड्या पडतात अन् खरे लाभार्थी मागे राहतात,असाच काहीसा प्रकार बुलढाणा- चिखली मार्गावरील जिल्हा बांधकामगार केंद्रावर पाहायला मिळतोय.इथे नाव नोंदणीसाठी कडाक्याच्या थंडीत रात्री एक वाजतापासून तोबा गदर्दीचे चित्र दररोजचे दिसते. शासकीय लाभासाठी नाव नोंदणी करिता प्रतिष्ठित फुकट्यांच्या उड्यावर उड्या पडत असून,गरजू आणि खरे लाभार्थी वंचित राहण्याच्या स्थितीत आहेत. अनेक गोरगरीब लाभार्थ्यांना रात्री १ वाजता रांगेत नंबर लावल्यावर सकाळी ५ वाजता मोठ्या मुश्किलीने नंबर लागतो. त्यामुळे यंत्रणेने याकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. शासनाकडून बांधकाम कामगारांना विविध सोयी-सुविधा देण्यात येतात. त्यासाठी मात्र संबंधित कामगाराची रितसर नोंदणी असणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने गत काही दिवसांपासून ही प्रक्रिया राबविण्यात येत असून नोंदणी करण्याकरिता कामगारांची चिखली रोड वरील कार्यालयावर रात्री बेरात्री अक्षरश: झुंबड उडत आहे. कार्यालयासमोर पाय ठेवायलाही जागा उरत नाही.गरजू लाभार्थ्यांसोबत फुकट्यांची अचानक गर्दी वाढल्याचे दिसून येत आहे.तर खरे लाभार्थी त्रस्त होताहेत. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीकृत कामगारांना गृह उपयोगी वस्तू



खरेदीसाठी अर्थसहाय्य, लाभार्थी कामगारांच्या पाल्ल्यास व्यक्तिमत्व विकास पुस्तक संचाचे वाटप, विविध कल्याणकारी योजनेचे आर्थिक सहाय्य, अवजारे खरेदी करण्यासाठी ५ हजार रुपये अर्थसहाय्य, अत्यावश्यक संच, सुरक्षा संच खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येते. त्याचा लाभ मिळवू इच्छित जिल्ह्यातील बांधकाम कामगारांसह प्रतिष्ठित फुकट्यांनी देखील नोंदणी करण्यासाठी सदर कार्यालयात गर्दी केल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

# २५ जानेवारीला मॉडेल डिग्री येथे मराठी भाषा पंधरवडा निमित्य मार्गदर्शन शिबीराचे आयोजन




**जनसंचलन/बुलडाणा**

मराठी भाषा विभाग आणि मॉडेल डिग्री कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २५ जानेवारीला मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ३६ जिल्हे ३६ मार्गदर्शन सत्रेअंतर्गत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे मराठी भाषेचे संवर्धन आणि जतन करण्याच्या दृष्टिकोनातून मराठी भाषा विभागाच्या वतीने राज्यभर ३६ जिल्हे ३६ मार्गदर्शन सत्रे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे बुलढाणा येथे हे सत्र आयोजित करण्याचा बहुमान बुलडाणा येथे मॉडेल डिग्री कॉलेजला मिळाला आहे त्यांनिमित्य एका कार्यक्रमाचे आयोजन २५ जानेवारीला करण्यात आले आहे या कार्यक्रमा दरम्यान मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी या विषयावर तज्ञ मार्गदर्शन करणार आहे या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक व मराठी भाषेची अभ्यासक रमेश इंगळे उत्रादकर उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक प्राचार्य डॉ अण्णासाहेब म्हळसने उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी आणि साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे असं आवाहन मराठी भाषा विभागाचे अप्पर मुख्य सचिव मनीषा पाटणकर - म्हैसकर भाषा संचालक विजया डोनीकर , मॉडेल डिग्री कॉलेज येथील मराठी विभागाचे भ प्राध्यापक डॉ किं वा वाघ आणि डॉ मनीषा राऊत यांनी केला आहे .

---

# हे पुष्पा झुकणार का?

# जलाशयामध्ये ३ बोटी जिलेटीनच्या साह्याने उडविल्या!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे मार्गदर्शना खाली जिल्हास्तरीय शोध पथकाच्या साहाय्याने संतचोखासागर (खडकपूर्णा) जलशयात आज दि. २२ जानेवारी २०२५ ला सकाळी ९.०० वाजेपासून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या बोटीची शोध मोहीम प्रा. संजय खडसे, उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा, शरद पाटील उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांचे नियंत्रणामध्ये वैशाली डोंगरजाळ तहसीलदार देऊळगावराजा व संतोष काकडे तहसीलदार चिखली यांचे पथकाच्या साहाय्याने ०३ बोटी जिलेटिन च्या साह्याने उडविण्याची कारवाई करण्यात आली आहे. खडकपूर्णा जलाशयामध्ये अवैधरित्या वाळूचा उपसा करणाऱ्या बोटी टाकून ज्यांच्या साहाय्याने वाळू उपसतात अशा बोटी नष्ट करण्याची मोहीम राबविण्यात यावी अशा प्रकारचे निर्देश मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी दिले त्यानुसार आज दि. २२ जानेवारी २०२५ ला शोध पथकाची बोट व ड्रोन च्या साहाय्याने धरणाची पाहणी करण्यात आली, त्यामध्ये सिनगाव जहागीर येथे ०१ फायबर बोट ०१ छोटी इंजीन बोट आढळून आली तसेच सदर बोटीवर छत्तीसगड राज्यातील ०३ मजुर यांच्यावर पोलिस स्टेशन देउळगावराजा येथे ग्राम महसुल अधिकारी सिनगाव जहाँगीर श्री मधुकर उदार यांच्या मार्फत् गुन्हा दाखल करण्यात आला त्यांचे नावे १. साफीकूल शेख इरफान शेख वय ३२ वर्षे २. समुल शेख नजरुल शेख वय ३४ वर्षे रा पियारपुर ता राधानगर, जि. साहेबगंज, राज्य छत्तीसगड ३. मी सावा करीम मो आबु बक्कर वय २५ वर्षे रा बेगमगंज ता राधानगर, जि साहेबगंज, राज्य छत्तीसगड अशी आहेत. सदर मजुरांनी अवैधरित्या उपसा केलेली रेती सुद्धा सदर बोटीमध्ये आढळून आली त्यावरून सदर मजुराच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोलीस विभाग करीत आहे तसेच सदर दोन्ही बोटी जिलेटिन च्या साह्याने उडवुन त्यांचे नुकसान करण्यात आले तसेच ड्रोनच्या साह्याने इसरूळ व बायगावच्या मध्यभागी एक बोट आढळून आली. ती बोट सुद्धा जिलेटिन च्या साह्याने उध्वस्त करण्यात आली अशाप्रकारे तीन बोटींवर कारवाई करण्यात आली, यामध्ये तीन बोटीची किंमत अंदाजे ३० लक्ष रुपये आहे. तसेच यापूर्वी मा.जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी जिल्हाधिकारी जालना यांना पत्र देऊन खडकपूर्णा जलाशयातील बोटींवर संयुक्तपणे कारवाई करण्याबाबत विनंती केली होती. आज दिनांक २२ जानेवारी २०२५ च्या कार्रवाईदरम्यान उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी जाफ्राबाद तालुक्याच्या तहसिलदार सारीका भगत यांच्याशी संपर्क साधून या भागातून पळून गेलेल्या बोटी जाफराबाद हददीमध्ये मध्ये आढळुन आल्यास, त्यांची अडवणूक करून त्यांच्यावर कारवाई करावी असे सांगीतले. त्यानुसार त्यांनी त्यांच्या भागात गेलेल्या जवळपास सहा बोटीवर कारवाई केल्याची माहिती तहसीलदार सारिका भगत यांनी उपविभागीय अधिकारी यांना कळविली आहे. अशाप्रकारे दोन्ही जिल्ह्यांमधून संयुक्त कारवाई करण्यात आली आहे. सदरील कारवाई मा. जिल्हाधिकारी, बुलढाणा किरण पाटील यांच्या निर्देशानुसार, प्रा. संजय खडसे, मा. उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा व शरद पाटील, मा. उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली मनिषा कदम, उपविभागीय पोलिस अधिकारी देउळगावराजा, वैशाली डोंगरजाळ, तहसिलदार देउळगावराना, संतोष काकडे तहसिलदार चिखली, संतोष महल्ले ठाणेदार देउळगावराजा, सायली जाधव, नायब तहसीलदार महसुल देउळगावराजा, पि पि घोटकर, नायब तहसीलदार निवडणुक देउळगावराजा, डी बी नरवाडे पोलिस स्ट्रेशन् देउळगावराजा व पथकातील मंडळ अधिकारी एम एल वायडे, विजय हिरवे, अरविंद शेळके, नारायण सोनुने, ग्राम महसूल अधिकारी राजु तागवाले, सुमित जाधव, श्रीमंत पांडव, श्री चव्हान, श्री कटारे, आकाश खरात, संजय हांडे, मधुकर उदार, अनिल बोंद्रे, किशोर सोळंके, वाहन चालक कैलास चव्हान, महसुल सेवक सचिन बंगाळे, विठठल हरणे यांच्या मार्फत करण्यात आली. सदरील कारवाईमध्ये शोध व बचाव पथकाचे ए एस आय श्री तारासिंग पवार, पोलिस कॉ पाटील व त्यांच्या टिम हजर होती. यापुढेही बोटीच्या सहाय्याने अवैध रेती उत्खननचा प्रयत्न झाल्यास जिल्हा स्तरीय शोध व बचाव पथकाचे मार्फत अवैध उत्खननाबाबत वारंवार कारवाई करण्यात येईल. तसेच जे शेतकरी रेतीचे अवैध उत्खननास रस्ता उपलब्ध करुन, अवैध रेतीसाठा करण्यास सहाकार्य करतील त्यांच्या ७/१२ वर याबाबतचा बोजा चढविण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच रेतीचे अवैध उत्खनन व वाहतुक होवु नये यासाठी गस्ती पथक स्थापन करण्यात आले आहे.

# मेहकर पं.स. मधील शिक्षक सातपुते पती - पत्नी निलंबित

## दोन पेक्षा जास्त अपत्य असणे भोवले दोघांनाही बडतर्फ करण्याची तक्रारदारांची मागणी

जनसंचलन/मेहकर

मेहकर पंचायत समिती अंतर्गत विश्वी येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक गजानन सातपुते व पांगरखेड शाळेवर कार्यरत असलेल्या त्यांच्या पत्नी छाया सातपुते या दोघांनाही सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. कुटुंबातील मुलांची माहिती लपवत बनावट छोटे कुटुंब प्रतिज्ञापत्र सादर केले. त्या आधारावर या दांम्पत्याने शिक्षक पदाची सरकारी नोकरी करत पगार घेतला अशी तक्रार २८ डिसेंबर २०२३ रोजी देवेंद्र आखाडे व इतर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक गजानन सातपुते व त्यांची पत्नी सौ छाया सातपुते या शिक्षक दांपत्याने शासनाचे फसवणूक केली असल्याची तक्रार देवेंद्र आखाडे इतरांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली होती. त्यानंतर शिक्षणाधिकारी यांनी १७ जानेवारी २०२४ च्या पत्रान्वये गटशिक्षणाधिकारी पं.स. मोठा यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणांमध्ये चार सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. त्यामध्ये सदस्य सचिव गटशिक्षण अधिकारी पं. स. चिखली, शिक्षण विस्तार अधिकारी पं. स. चिखली सदस्य, केंद्रप्रमुख पं.स. चिखली सदस्य यांचा समावेश होता. सात दिवसात सदर चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. दरम्यान चौकशीत विलंब झाल्याने बी.आर. खरात शिक्षणाधिकारी बुलढाणा यांनी चौकशी प्रकरणी हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या होत्या. त्यानंतर चौकशी समिती अध्यक्ष यांनी ३१/१०/२०२४ रोजी शिक्षण अधिकारी यांना चौकशी अहवाल सादर केला होता. गजानन नामदेव सातपुते स.अ. यांना ४ अपत्य आहे त्यातील २ अपत्य २८ मार्च २००५ नंतरचे आहेत व छाया गजानन सातपुते यांचे तीन विवाह झाले असून त्यांना ३ अपत्य आहेत त्यातील एक अपत्य २८ मार्च २००५ नंतरचे आहे. २८ मार्च २००५ च्या शासन अधिसूचनेप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांचे कुटुंब लहान असावे म्हणजे दोन किंवा त्यापेक्षा कमी अपत्य असणे अपेक्षित आहे तसेच लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही असे नमूद आहे. तसेच सौ छाया गजानन सातपुते यांचे अपंगाचे प्रमाणपत्र अपंगत्व पडताळणी करून तक्रार करण्याच्या तक्रारीचे निरीक्षण करावे असे मत व्यक करत तक्रारीत दोन पेक्षा जास्त अपत्य असल्याबाबतच्या तक्रारी मध्ये तथ्य आहे. अपंगत्वाचे प्रमाणपत्र बोगस आहे किंवा कसे सक्षम अधिकारी यांच्याकडून तपासणी होण्यासाठी पाठवण्यात आले असून २८ मार्च २००५ मध्ये शासन अधिसूचनेप्रमाणे कारवाई करणे उचित होईल असे चौकशी अहवालामध्ये अभिप्रायत सांगितले होते. तसेच डोणगाव पोलीस स्टेशन येथे दिनांक १ फेब्रुवारी २०२४ रोजी या दोन्ही शिक्षक पती पत्नी यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून त्याचा अहवाल गटशिक्षण अधिकारी यांना प्राप्त झाला होता. म्हणून महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ व महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ अन्वये तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचे आदेश क्रमांक बुजिप/ साप्रवि/ अस्था-५/७२६/२०२४ गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती मेहकर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा( शिस्त व अपील) नियम १९६४ मधील भाग २ नियम ३ (ब) अन्वये असणाऱ्या अधिकाराचा वापर करून गजानन नामदेव सातपुते विषय शिक्षक गणित/ विज्ञान व सौ छाया गजानन सातपुते स.अ. यांना दिनांक २१ जानेवारी २०२५ पासून निलंबित करीत असल्याचा आदेश काढला. दरम्यान ज्ञानेश्वर टाले, गणेश गारोळे, देवेंद्र आखाडे, आकाश माळोदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा त्यांची भेट घेऊन सदर दाम्पत्याची खातीनिहाय चौकशी करून यांना सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी केली आहे. त्यानुसार गट विकास अधिकारी यांनी श्रीमती एल आर घेवंदे कनिष्ठ सहाय्यक डोणगाव विस्तार यांना दोषारोप पत्र १ ते ४ व संबंधित कागदपत्र साक्षीदाराचे यादीसह सादर करण्याचे आदेश दिल्याने खाते चौकशी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# काडीबाजांनी तीन अपत्य असल्याची तक्रार केली..अन् पती-पत्नींना निलंबित व्हावे लागले!

जनसंचलन/बुलढाणा



पती-पत्नी शिक्षक आणि त्यांना २१ जानेवारीला नोकरीतून निलंबित करण्यात आले.कोण्या तरी काडीबाजांनी तीन अपत्य असल्याची तक्रार केली.परंतु त्यांच्या निलंबनाची कारवाई त्वरित रद्द करून न्याय द्यावा, अशी मागणी या पती-पत्नींनी केली आहे. प्रकरण असे आहे की,गजानन नामदेवराव सातपुते (विषय शिक्षक) जि.प. शाळा विश्वी व सौ. छाया गजानन सातपुते (शिक्षिका) जि. प. शाळा पांगरखेड पंचायत समिती, मेहकर जि. बुलडाणा यांनी संबंधित यंत्रणेला तक्रार दिली आहे.या तक्रारीत म्हटले आहे की,२१ जानेवारी रोजी आम्हाला जे निलंबीत केले ते रद्द करण्यात यावे,कारण सदर निलंबनाची कारवाई केली ती सर्वार्थाने चुकीची आहे. तिसऱ्या आपत्याच्या संदर्भात २८ मार्च २००५च्या नियमानुसार, एखद्या कर्मचाऱ्याला २००५ अगोदर दोन आपत्य असतील व नंतर २००५ नंतर तिसरे आपत्य झाले तर त्याला सेवेतून बडतर्फ करता येत नाही. अथवा बडतर्फ करण्यासाठी वरील स्तरावरील शासनाचे कोणतेही आदेश नाही.शिक्षक गजानन सातपुते यांची नियुक्ती ३० जुलै १९९७ तर छाया गजानन सातपुते यांची नियुक्ती ११ जुलै २००० रोजी झालेली आहे. त्यामुळे वरील नियम बडतर्फ करण्यासाठी लागू पडत नाही.तसेच तक्रार म्हटले आहे की, छाया गजानन सातपुते यांचे दिव्यांग प्रमाणपत्र हे वैध आहे. युडीआयडी कार्ड आहे. प्रमाणपत्र क्रमांक एम.एच.०४६०६१९७६०५२७९४७ असून जन्मतारीख ६ फेब्रुवारी १९७६ आहे. त्यामुळे वेबसाईटवर प्रमाणपत्र तपासू शकता व डोणगाव पोलिस स्टेशनला दाखल झालेल्या एफआयआर मध्ये एक फेब्रुवारी २०२४ नुसार गजानन सातपुते व छाया सातपुते यांचेवर ३०७ चा गुन्हा दाखल झाल्यापासून त्यांना कोणतीही पोलिस कोठडी झाली नाही. सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. तक्रारकर्त्यांनी वारंवार तिसरे आपत्य संदर्भात कारवाईसाठी निवेदन देवून वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द केल्या.पैसे उकळण्यासाठी हा डाव होता,असाही पीडित दाम्पत्याचा दावा आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

जनसंचलन/बुलढाणा



आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेना या राजकीय पक्षाचे संस्थापक व प्रसिद्ध व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिलहाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, समाधान गायकवाड तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले

# जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने इकबाल चौकातील अतिक्रमणावर चालले बुलडोझर...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा शहरातील इकबाल चौकातील नजोलच्या जागेवरील अतिक्रमण हटवण्याचे काम नगरपरिषद व पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले शहरातील इकबाल चौकातील जामा मस्जिद समोरील एक ग्लास जमिनीवरील अतिक्रमण मागील वर्षे काढण्यात आले होते परंतु काही दिवसानंतरच त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण धारकांनी आपले प्रतिष्ठान लावून पूर्ववत अतिक्रमण केले त्यामुळे आज पुन्हा जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू करण्यात आली नगरपरिषदेने नोटीसा देऊन देखील अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण काढले नसल्याने त्यांच्या दुकानांवर आज नगरपालिका व पोलीस विभागाच्या वतीने बुलडोजर चालवण्यात आले यावेळी कुठला अनुचित प्रकार घडू नये याकरिता मोठा पोलिसांचा पाऊस फाटा देखील या अतिक्रमण काढण्याच्या प्रक्रियेत बघायला मिळाला

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958